# मिरा भाईंदर महानगरपालिका

**निवडणुक विभाग**

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला,**

**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),**

**ता.जि. ठाणे, ४०१ १०१.** दुरध्वनी क्र. २८१९२८२८/२८१९३०८७.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/नि.वि./१६२/२०२५-२६** **दिनांक:- १८/११/२०२५**

**मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५**

**प्रारुप मतदार यादी**

## // जाहीर सूचना //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांना या जाहीर सूचनेव्दारे कळविण्यात येते कि, मा. राज्य निवडणुक आयोगाच्या क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५ दि. १४/१०/२०२५ व १३/११/२०२५ रोजीच्या आदेशानुसार दि. ०१/०७/२०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरून मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक-२०२५ करीता प्रभाग निहाय प्रारूप मतदार यादी तयार करण्यात आली आहे. सदर प्रभाग निहाय प्रारूप मतदार यादी दि. २०/११/२०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय व सर्व प्रभाग समिती कार्यालयांच्या सूचना फलकावर तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या (www.mbmc.gov.in) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

प्रारूप मतदार यादीबाबत काही हरकती व सूचना असल्यास त्या, मा. राज्य निवडणुक आयोगाने ठरवुन दिलेल्या **नमुना-अ (मतदारांसाठी)** व **नमुना-ब (तक्रारदारांसाठी)** मध्ये दि. २०/११/२०२५ ते दि. २७/११/२०२५ या कालावधीत मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, पहिला मजला, कर विभाग, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) येथे कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत; याची सर्व नागरीकांनी नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| (१) | प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि. २७/११/२०२५ |
| (२) | प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना स्विकारण्याचे ठिकाण | मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, पहिला मजला, कर विभाग, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) |

टिप : (१) ऑनलाईन अथवा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ई-मेल वर प्राप्त हरकती व सूचना ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

(२) क्रमांक २ मध्ये नमुद केलेल्या कार्यालयातच हरकती व सूचना दाखल करण्यात याव्यात. या व्यतिरिक्त अन्य ठिकाणी दाखल केलेल्या हरकती व सूचना ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

**(राधाबिनोद अ. शर्मा,** भा.प्र.से.)

**आयुक्त तथा प्रशासक**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**